क्र. प्रशि/पोशि-भरती/समकक्षता- मार्गदर्शन /२०११ /4632

मुंबई दि. १७/१०/२०११

संदर्भ :- शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. आरजीडी-१५११/प्र.क्र ८९/१३, दि. २०/०५/२०११

17 OCT 2011

विषय :- पोलीस शिपाई भरती - २०११
शैक्षणिक अर्हतेच्या समकक्षेबाबत. . .

*****

पोलीस शिपाई भरतीकरिता १०वी / १२वी (माध्यमिक / उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण असणे अशी किमान अर्हता विहीत करण्यात आली आहे. परंतु संदर्भाधीन दि. २०/०५/२०११ च्या शासन निर्णयानुसार यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक व राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली यांची प्रमाणपत्रे शासन सेवेसाठी समकक्ष म्हणून घोषित केली आहेत.

२. पोलीस भरती करिता आलेला उमेदवार जर १०वी अनुत्तीर्ण असेल परंतु तो संदर्भाधीन शासन निर्णयानुसार पोलीस भरती मध्ये आवेदन अर्ज भरण्यास पात्र ठरत असेल तरीही सद्या उपलब्ध असलेल्या ऑन लाईन सिस्टिम मध्ये उमेदवाराने १० वी या शैक्षणिक अर्हतेमध्ये नापास नमुद केल्यास सदर सिस्टिम उमेदवाराचा अर्ज स्विकारत नाही त्यामुळे तो उमेदवार पुढील आवेदन अर्ज भरु शकत नाही. याबाबत या कार्यालयास उमेदवारांच्या सदर अडचणीबाबत बहुतेक घटकांकडुन/ उमेदवारांकडुन विचारणा करण्यात आली आहे. अशा उमेदवारांना ऑन लाईन आवेदन अर्ज भरणे शक्य व्हावे म्हणून खालील प्रमाणे मार्गदर्शन करण्यात येत आहे.

३. सदर उमेदवार वरील शासन निर्णयान्वये परीक्षेसाठी शैक्षणिक अर्हतेत समकक्ष म्हणन पात्र ठरत असल्याने अशा उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना शैक्षणिक अर्हता या रकान्यात १०वी उत्तीर्ण नोंद करून त्या नंतर उपलब्ध होणाऱ्या इतर या ऑप्शनवर यशवंतराव चव्हाण, मुक्त विद्यापीठ, पुर्व परीक्षा असे नमुद केल्यास तो पुढील आवेदन अर्ज भरु शकेल. तसेच १२ वी या शैक्षणिक अर्हते मध्ये इतर या ऑप्शनवर यशवंतराव चव्हाण, मुक्त विद्यापीठ पदवी परीक्षेचे प्रथम वर्ष उत्तीर्ण / पदवी धारण असे नमुद करुन आवेदन अर्ज भरु शकेल व सदर उमेदवार आवेदन अर्ज भरण्यापासून वंचित राहणार नाही.

४. तरी सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, जर असा उमेदवार त्यांचे घटकात आवेदन अर्ज भरणेबाबत परवानगी घेण्यास आल्यास त्याचेकडील संबंधित कागदपत्रे तपासून त्याचे कडून रितसर अर्ज घेवून त्यास वरील प्रमाणे कार्यवाही करण्याची परवानगी देण्यात यावी.

17.10.11.

( दिलीप सावंत)
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरीता

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त, (लोहमार्गसह)
सर्व पोलीस अधिक्षक, (लोहमार्गसह)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ ते १३

D:Police Bharti/PB 2011/PB 13-09-11